महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI
अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्
1969

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## सप्टेंबर २०२४

# ई वार्ता




N

**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ✯ | Post Graduate Institute | 01 |
| ❁ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✸ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ✪ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| ⦂ | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५५/२०२४

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४५, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे व आय.आय. केअर फाउंडेशन, नवी मुंबई यांच्याशी सामंजस्य करार





**दि. २५ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे व आय.आय. केअर फाउंडेशन, नवी मुंबई यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे सदस्य तथा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचे कार्यकारी परिषद सदस्य श्री. विनायक काशीद, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पुणेचे संचालक प्रा. राजेश जालनेकर, आय.आय. केअर फाउंडेशन, नवी मुंबईचे संचालक डॉ. संतोष भोसले, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने आणि मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगावचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते. कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील मार्गदर्शनपर म्हणाले की काळाची गरज पाहता कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार करताना लागणाऱ्या मनुष्यबळाची कमतरता तंत्रज्ञानाच्या वापराने कमी करता येईल तसेच संशोधनासाठी लागणारे तंत्रज्ञान अत्याधुनिक असल्यास त्यामधील अचूकता वाढून हवामानातील बदलासंबंधीच्या अभ्यासांमध्ये त्याचा खूप चांगला उपयोग होऊ शकतो. श्री. तुषार पवार यांनी यावेळी ऊस उत्पादक शेतकरी व ऊस कारखानदारांचे प्रश्न यांची सांगड घालून यासंबंधी उपाय करण्याची गरज व्यक्त केली. श्री. विनायक काशीद यांनी आपल्या मार्गदर्शनात सध्या पावसाच्या वितरणातील असमतोलाचा उल्लेख करत दिवसेंदिवस उसाचे क्षेत्र कमी होत आहे याकडे लक्ष वेधले. प्रा. राजेश जालनेकर यांनी विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वाटचालीचा आढावा घेत शेतीप्रधान क्षेत्रामध्ये पिकांसाठी बाष्पीभवन अतिशय महत्त्वाचा भाग असून कृत्रिम बुद्धिमत्तेचा तसेच वेगवेगळ्या प्रकारची गणकतंत्राचा ऑनलाइन वापर करून बाष्पीभवन अचूकपणे काढण्याच्या प्रकल्पासाठी हा सामंजस्य करार केल्याचे नमूद केले. डॉ. संतोष भोसले यांनी आय. आय. केअर फाउंडेशन, नवी मुंबईच्या सामंजस्य कराराचे स्वरूप स्पष्ट करताना ऊस उत्पादक व साखर कारखान्यांमध्ये लागणाऱ्या विविध सॉफ्टवेअर्स विकसित करून त्याद्वारे अडचणींवर मात करण्यासाठी शिक्षण व्यवस्थापन प्रणालीचा वापर करणार असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महानंद माने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अभय पाटील यांनी तर आभार डॉ. दीपक सावळे यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पुणे कृषि महाविद्यालयाचे मृदाशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन

**दि. २१ सप्टेंबर,२०२४.** कृषि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतल्यानंतर त्यांना विविध क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. त्यांनी यासाठी अधिक जागृत राहून अभियांत्रिकीच्या विषयांबरोबरच विविध संधीचा फायदा घेऊन विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडवावे असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. या प्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महानगरपालिकाचे आयुक्त श्री. यशवंत डांगे उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. मुकुंद

शिंदे, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, डॉ. वीरेंद्र बारई व सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठातील बी. टेक. पदवीनंतर कोणकोणत्या क्षेत्रामध्ये त्यांचे करिअर करता येईल याबाबत मार्गदर्शन केले.





यावेळी प्रमुख पाहुणे श्री. यशवंत डांगे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी कशा प्रकारचे करिअर निवडावे यासंबंधी मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. दिलीप पवार यांनी विद्यार्थ्यांना नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०-२० ही यावर्षापासून लागू केलेली आहे व त्यामध्ये कोणकोणते महत्त्वाचे बदल झालेले आहेत याबद्दल सांगितले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दीक्षारंभ कार्यक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. श्री. अरुण आनंदकर यांनी प्रथम वर्ष बी. टेक विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना विद्यापीठाकडून सर्व प्रकारची मदत होईल तसेच त्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाहीत याची खात्री दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी तर आभार स्वाती वरपे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात तीन दिवसीय विस्तार शिक्षण प्रशिक्षणाचे आयोजन





**दि. २३ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व गुजरात राज्यातील आनंद येथील विस्तार शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी विस्तार शिक्षणाच्या नाविन्यपूर्ण पध्दती या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, आनंद येथील विस्तार शिक्षण संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. ए.पी. निनाम्मा उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पाने विकसीत केलेल्या मॉडेलमुळे चिंचविहिरे, कणगर, कानडगांव व तांभेरे येथील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे. विद्यापीठाचे आयडॉल म्हणुन निवड केलेल्या प्रगतशील शेतकऱ्यांच्या यशोगाथा अधिकाधीक शेतकऱ्यांपर्यंत गेल्या पाहिजेत. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की एखादे तंत्रज्ञान

प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यासाठी प्रभावी प्रसारमाध्यमांची गरज असते. डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की या प्रशिक्षणाच्या मदतीने शेती क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे विस्तार कार्यकर्ते नवनविन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचु शकतील. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. निनाम्मा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. तीन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणासाठी विद्यापीठातील २५ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २४ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने पाच दिवसीय आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदवीत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील व अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड उपस्थित होते. कुलगुरू डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की फळे ही नाशवंत असतात. परंतु या फळांपासून विविध प्रक्रिया करून पदार्थ निर्मिती केली तर त्या फळांचे मूल्यवर्धन होते. परिणामी फळे पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. फळ प्रक्रियेवर आधारित अशा प्रशिक्षणांमधूनच उद्याचे उद्योजक घडून ग्रामीण अर्थकारण मजबूत होऊ शकते. डॉ. शिर्के यावेळी म्हणाले की उद्योजक घडविण्यासाठी अशा प्रकारची फळ प्रक्रियेवरील प्रशिक्षणे फार फायद्याची असून हे प्रशिक्षण घेऊन स्वतःचा उद्योग सुरू करणारे उद्योजकच खऱ्या अर्थाने विद्यापीठाची ताकद आहे. डॉ. ससाणे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी पदार्थ निर्मितीच्या आपल्या नवीन कल्पना या प्रशिक्षणामध्ये मांडा. त्यातूनच एखाद्या नव पदार्थाची निर्मिती होऊ शकते. डॉ. खरबडे यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. या पाच दिवसीय आवळा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमात आवळा कॅन्डी, आवळा गर साठवण, आवळा लोणचे, आवळा सरबत, आवळा सुपारी, आवळा मुरंबा, आवळा सिरप व स्क्वॅश आणि आवळा पावडर या विषयांवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम कड यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मागील काळात झालेल्या विविध फळ प्रक्रियेवरील प्रशिक्षणांमधून स्वतःचे उद्योग सुरू करणाऱ्या उद्योजकांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राहुल घुगे यांनी तर आभार डॉ. बाबासाहेब भिटे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी उद्योग विभागातील प्राध्यापक डॉ. जितेंद्र ढेमरे, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, कृषि माहिती तंत्रज्ञान केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचरणे तसेच विविध जिल्ह्यातून आलेले वीस पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठातर्फे रब्बी पिकाचे बियाणे विक्रीसाठी उपलब्ध

**दि. २२ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रब्बी २०२३-२४ हंगामामध्ये मोठ्या प्रमाणावर ज्वारी, करडई, हरभरा व गहू पिकांचा मूलभूत व प्रमाणित/ सत्यप्रत बिज्योत्पादन कार्यक्रम राबविलेला आहे. रब्बी २०२४-२५ हंगामासाठी वरील पिकांचे बियाणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध संशोधन केंद्र, कृषि महाविद्यालय, कृषि तंत्र विद्यालय व कृषि विज्ञान केंद्र या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या नजीकच्या कृषि विद्यापीठाच्या संशोधन केंद्रावर, कृषि महाविद्यालय, कृषि तंत्र विद्यालय व कृषि विज्ञान केंद्र येथे बियाणेसाठी संपर्क साधावा. राहुरी येथील मध्यवर्ती बियाणे विक्री

मफुकृवि ई वार्ता
सप्टेंबर २०२४

केंद्रावर व कृषि संशोधन केंद्र, चास, ता. जि. अहमदनगर येथे ज्वारीच्या फुले रेवती, फुले वसुधा, फुले सुचित्रा, फुले यशोमती, फुले मधुर, फुले रुचिरा, करडईच्या फुले भिवरा (एसएसएफ–१३–७१) विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे तसेच हरभऱ्याचे विजय, फुले विश्वराज, दिग्विजय, विशाल, फुले विक्रम, फुले विक्रांत व गव्हाचे फुले समाधान या वाणांचे प्रमाणित /सत्यप्रत बियाणे ऑक्टोबर– २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर येथे करडईच्या फुले भवरा (एसएसएफ–१३–७१) या वाणांचे प्रमाणित/सत्यप्रत बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. कृषि संशोधन केंद्र, कुंदेवाडी, ता. निफाड या विक्री केंद्रावर हरभऱ्याच्या दिग्विजय, विशाल, फुले विक्रम, फुले विक्रांत व गव्हाच्या फुले समाधान या पिकांच्या वाणाचे प्रमाणित/ सत्यप्रत बियाणे ऑक्टोबर २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म, ता. हवेली, जि. पुणे या विक्री केंद्रावर गव्हाचे फुले समाधान या वाणांचे प्रमाणित/सत्यप्रत बियाणे ऑक्टोबर २०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव, जि. सातारा व कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील विक्री केंद्रावर गव्हाचे फुले समाधान या वाणाचे प्रमाणित सत्यप्रत बियाणे ऑक्टोबर–२०२४ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नितीन दानवले यांनी शेतकऱ्यांना या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ५ अधिकारी व कर्मचारी झाले सेवानिवृत्त





**दि. ३० सप्टेंबर, २०२४.** शासकीय सेवेमध्ये काम करताना व्यक्ती कोणत्याही पदावर असेल, अशावेळी ती व्यक्ती तिचे काम कशा पद्धतीने करत आहे याला फार महत्त्व असते. यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे या कर्मचाऱ्यांच्या अंगी असलेला प्रामाणिकपणा हा सर्वात महत्त्वाचा गुण होय. यामुळेच आपण केलेले काम इतरांसाठी मार्गदर्शक ठरून ते काम करत असलेली संस्थासुद्धा उच्चपदाला पोहोचते. विद्यापीठात काम करणारा मजूर असेल किंवा इतर कर्मचारी, अधिकारी असेल या सर्वांच्या एकत्रित कामामुळेच विद्यापीठाचे नाव मोठे होत असते असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव श्री. अरुण आनंदकर यांनी केले. यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सेवानिवृत्त कर्मचार्यांचा सत्कार व सेवानिवृत्त विषयक लाभ देण्यासाठी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना श्री. अरुण आनंदकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे व अधिष्ठाता कार्यालयाचे डॉ. रवींद्र आंधळे उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या राहुरी, कोल्हापूर व पुणे या तीन विभागातील ५ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के व श्री. अरुण आनंदकर यांच्या हस्ते सेवानिवृत्त होणारे डॉ. सोमनाथ धोंडे, श्री. संजय दुबे व श्री. विश्वनाथ दळे या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव श्री. अरुण आनंदकर यांच्या कार्यतत्पतेमुळे सेवानिवृत्त होणाऱ्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तीविषयक लाभ अदा करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. संजय रुपनर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील, सहाय्यक कुलसचिव (प्रशासन) श्री. सागर पेंडभाजे, श्री. बाळासाहेब पाटील, श्रीमती शैला पटेकर व श्रीमती शिल्पा चतारे यांनी अथक परिश्रम घेतले.

वर्ष :४, अंक क्रं. : ४५, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

सप्टेंबर २०२४



## कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठास भेट





**दि. ११ सप्टेंबर, २०२४.** पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाला भेट दिली. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. याप्रसंगी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्याची माहिती महासंचालकांना दिली. यावेळी विद्यापीठातील रिक्त जागांबद्दलही चर्चा करण्यात आली तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी विद्यापीठातून पाठविल्या गेलेल्या प्रस्तावांबाबत त्यांनी माहिती घेतली. त्याचप्रमाणे या वर्षाची कृषि पदवीची प्रवेश परीक्षा याबाबत त्यांनी माहिती घेतली. विद्यापीठाचा सेंद्रिय संशोधन प्रकल्प, बांबू प्रकल्प व पुणे कृषि महाविद्यालयातील देशी गाय संशोधन व विकास प्रकल्पाबाबत त्यांनी माहिती घेतली. यावेळी महासंचालकांनी विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन व विस्तार कार्यातील आतापर्यंतच्या भरीव योगदानाबद्दल तसेच विद्यापीठ विविध पिकातील बीजोत्पादनाच्या करीत असलेल्या उच्चांकाबद्दल समाधान व्यक्त केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील चारा पिके प्रकल्पाला अँड. श्री.निलेश हेलोंडे पाटील यांची भेट





**दि. १४ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित चारा पिके संशोधन प्रकल्पास व गवत संशोधन प्रकल्पास अमरावती येथील कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष मा. अँड. श्री.निलेश हेलोंडे पाटील यांनी भेट दिली. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख तथा वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. विजू आमोलिक, चारा पैदासकार डॉ. लक्ष्मण तागड, चारा पिके प्रकल्पाचे कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. संदीप लांडगे, अहमदनगरचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुनील तुंबारे, अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक श्री. अतुल बुटे व राहुरीचे कृषि अधिकारी श्री. अशोक गिरगुणे उपस्थित होते. यावेळी अँड. श्री.निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की राहुरी कृषि विद्यापीठातील चारा व गवत पिके प्रकल्पातील विविध पिकांवर झालेल्या

संशोधनाचा विदर्भ व मराठवाड्यातील पडीक जमिनीवर अवलंब केल्यास तेथील शेतकऱ्यांना वर्षभर हिरवा चारा उपलब्ध होऊ शकेल. या विद्यापीठात होत असलेले संशोधन विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक आहे श्री. निलेश हेलोंडे पाटील यांनी सांगितले.

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथे संशोधन संचालकांची भेट



**दि. ३ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, रहुरी अंतर्गत असलेले विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यानी भेट दिली. यावेळी डॉ. शिर्के यांनी संशोधन केंद्रात सुरू असलेल्या विविध संशोधन प्रकल्पांचा आढावा घेतला व प्रयोगांची पाहणी केली तसेच रोपवाटिकेस भेट देऊन शोभिवंत झाडांची मोठ्या प्रमाणात उत्पादन करून त्यांची विक्री कृषि महाविद्यालय विक्री दालन तसेच संशोधन केंद्रावरील विक्री केंद्रात करावी असे सुचवले. संशोधन केंद्राच्या भेटी दरम्यान संशोधन संचालक यांच्या शुभहस्ते माळी प्रशिक्षण केंद्रात वृक्षारोपण करून नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली. संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. दत्तात्रय लाड यानी संशोधन केंद्रावर सुरु असलेल्या संशोधन कार्याचे सादरीकरण केले. त्यानंतर संशोधन संचालक यांनी शास्त्रज्ञांशी संवाद साधतांना या संशोधन केंद्रावर विकसित केलेल्या डाळिंबाची गणेश व पेरूची सरदार या फळपिकांच्या लोकप्रिय वाणाबद्दल अभिमान व्यक्त करून सध्या कार्यरत असलेल्या शास्त्रज्ञांनी यांसारख्या उत्तम प्रतीच्या, कीड व रोगप्रतिकारक्षम आणि शेतकऱ्यांना फायदेशीर ठरतील अशा वाणांची निर्मिती करावी असे मत व्यक्त केले. यावेळी डॉ. व्ही.के. गरंडे, प्रा. एन.बी. शेख, डॉ. पी.एम. चौधरी, डॉ. जे.पी. यादव, डॉ. एस.के. चव्हाण, इतर शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते.

## पाडेगांव ऊस संशोधन केंद्राला संशोधन संचालकांची भेट





**दि. ७ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाखाली हे संशोधन केंद्र ऊस व साखर कारखानदारीमध्ये भरीव काम करत आहे. अशा राज्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या या ऊस संशोधन केंद्राला संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व नियंत्रक श्री. सदाशिव पाटील यांनी भेट देऊन संशोधन कार्याची माहिती घेतली, त्यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के बोलत होते.

वर्ष :४, अंक क्रं. : ४५, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

याप्रसंगी ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे, मृदशास्त्र विभागातील डॉ. कैलास काळे, ऊस कीटकशास्त्रज्ञ डॉ. शालिग्राम गांगुर्डे, ऊस शरीरक्रियाशास्त्रज्ञ डॉ. कैलास भोईटे, ऊस पैदासकार डॉ. सुरेश उबाळे व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी श्री. सदाशिव पाटील आपल्या मार्गदर्शनामध्ये म्हणाले की हे ऊस संशोधन केंद्र शेतकरी व कारखानदार यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे केंद्र आहे. ऊस व साखर उत्पादन वाढीमध्ये राज्य व देशाच्या विकासामध्ये या संशोधन केंद्राच्या वाणांचे अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. राजेंद्र भिलारे यांनी ऊस संशोधन केंद्राच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत या संशोधन केंद्राने प्रसारित केलेल्या १७ सुधारित वाण व शाश्वत ऊस शेती व उत्पादन वाढीसाठी ऊस लागवडीसंबंधीच्या किफायतशीर तंत्रज्ञानाच्या १०९ पेक्षा जास्त शिफारशींची माहिती देऊन आजपर्यंत प्रसारित वाणामुळे देश आणि राज्याच्या गोड क्रांतीमध्ये असलेले योगदान विषद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरज नलावडे यांनी तर आभार डॉ. सुरेश उबाळे यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन








**दि. १९ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील क्रीडा भवनात दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, काष्टी येथील कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. विजू अमोलिक, विभाग प्रमुख डॉ. प्रशांत बोडके, विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. महावीरसिंग चौहान, माजी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. शरद पाटील, माजी क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड, स्पर्धेचे पंच प्रा. आदिनाथ कोल्हे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की क्रीडा स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये जीवनात उपयोगी पडतील असे गुण विकसीत होतात. क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी झाल्यामुळे संघभावना जागृत होते, अंगमेहनत झाल्याने शरीर सुदृढ होते, नेतृत्वगुण वाढीस लागतात, नियोजनाची कला वृधींगत होते, चारित्र्यसंपन्नता वाढीला लागते. यावेळी डॉ. दिलीप पवार आपल्या

मार्गदर्शनात म्हणाले की जीवनात सर्व गोष्टींचा समतोल असला पाहिजे. विद्यार्थी जीवनात मेरीट तसेच मार्कांबरोबरच समाधान, आनंद, कला, खेळ हे सुध्दा तितकेच महत्वाचे आहे. प्रास्ताविक करतांना डॉ. साताप्पा खरबडे यांनी खेळामध्ये संघभावना महत्वाची असल्याचे सांगितले. यावेळी या स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करणाऱ्या निवड समितीच्या सदस्यांचा तसेच स्पर्धेचे पंच प्रा. आदिनाथ कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब भिंगारदे यांनी खेळाडूंना शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. आनंद चवई यांनी मानले. याप्रसंगी पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजय पाटील, विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, पदव्युत्तर महाविद्यालयाचे क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, सर्व सहभागी महाविद्यालयाचे संघ व्यवस्थापक, समित्यांचे सदस्य आणि विद्यार्थी व विद्यार्थींनी उपस्थित होते.

## आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेचा बक्षीस समारंभ संपन्न



**दि. २० सप्टेंबर, २०२४.** विद्यापीठात आयोजीत आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांचे शुभहस्ते झाले. यावेळी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. विजू अमोलिक, विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. महाविरसिंग चौहान, पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजय पाटील, माजी क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड, विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, पदव्युत्तर महाविद्यालयाचे क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, स्पर्धेचे पंच प्रा. आदिनाथ कोल्हे उपस्थित होते. यावेळी डॉ. खरबडे म्हणाले की व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये विजेत्या संघांनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन केले. कठोर मेहनत घेतल्यामुळे ते विजेते ठरले. या व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये मुलांच्या संघात कृषि महाविद्यालय, सोनईने प्रथम,कृषि महाविद्यालय, बारामती द्वितीय तर कृषि महाविद्यालय के.के. वाघच्या संघाने तृतीय क्रमांक पठकावला. मुलींच्या संघामध्ये कृषि महाविद्यालय, बारामतीने प्रथम, कृषि महाविद्यालय, पुणेच्या संघाने द्वितीय तर कृषि महाविद्यालय, सोनईच्या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. या आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये ३७ कृषि महाविद्यालयातील मुलांचे ३५ संघ व मुलींचे २२ संघ सहभागी झाले होते. यामध्ये ५५ शिक्षकांसह ४२० मुले तर २६० मुलींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. विजू अमोलिक यांनी मानले. याप्रसंगी सर्व सहभागी महाविद्यालयाचे संघ व्यवस्थापक, समित्यांचे सदस्य आणि विद्यार्थी व विद्यार्थींनी उपस्थित होते.

## पुणे येथे ठिबक व तुषार सिंचन तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षण संपन्न

**दि. १८ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील काटेकोर शेती विकास केंद्र, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, एन.सी.पी.एच., नवी दिल्ली व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, साखर संकुल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय ठिबक व तुषार सिंचन तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षण वर्गाचे आयोजन साखर संकुल येथे करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. सचिन डिंगरे, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मंगेश तिटकारे, फलोत्पादनाचे कृषि उपसंचालक श्री. संजय गुंजाळ, एमसीडीसीचे प्रशिक्षण विभाग प्रमुख श्री. दिगंबर साबळे,



मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी श्री. हेमंत जगताप, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, पुणेचे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार श्री. सचिन मोरे, कृषि महाविद्यालय, पुणे येथील प्राध्यापक श्री. चौधरी व श्रीमती मंदाकिनी पाटील, काटेकोर शेती विकास केंद्राचे श्री. रंजन पांडे उपस्थित होते. या एक दिवसीय प्रशिक्षणाचे आर्थिक सहाय्य एन.सी.पी.एच., भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. हेमंत जगताप यांनी तर आभार श्री. रंजन पांडे यांनी मानले. या प्रशिक्षणासाठी पुणे जिल्ह्यातील ३२ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## आवळा फळप्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप





**दि. २७ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागात आवळा फळप्रक्रिया या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि.२३ ते २७ सप्टेंबर, २०२४ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे उपस्थित होते. आवळा प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. याप्रसंगी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम कड, काढणीपश्चात तंत्रज्ञान केंद्रांचे प्रमुख डॉ. जितेंद्र ढेमरे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. बाबासाहेब भिटे व अर्थशास्त्र विभागातील कृषि संशोधन अधिकारी डॉ. जितेंद्र दोरगे उपस्थित होते. डॉ. ससाणे म्हणाले की आवळ्याचे किंवा आवळ्यापासून बनविलेल्या पदार्थांचे सेवन फायद्याचे असल्याने आवळा प्रक्रियेच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. प्रास्ताविक करताना डॉ. कड म्हणाले की सुशिक्षितांना प्रक्रिया तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षण, तांत्रिक सेवा व सल्ला उपलब्ध करून त्यांना स्वतःचा प्रक्रिया लघुउद्योग सुरू करण्यास प्रवृत्त करणे आणि या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती करणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उददेश्य आहे. या प्रशिक्षणादरम्यान आवळा कॅन्डी, आवळा गर, आवळा सरबत, आवळा सुपारी, आवळा पावडर, आवळा लोणचे, आवळा सिरप व स्क्वॅश इ. पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षणार्थ्यांना शिकविण्यात आले. त्याबरोबरच आवळा प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशिनरी, प्रक्रिया पदार्थांचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग, उद्योगाची नोंदणी याबरोबरच प्रक्रिया उद्योगातील अडचणी व त्यावरील उपाययोजना याबदद्ल देखील माहिती देण्यात आली. महाराष्ट्रातील सांगली, सोलापूर, कोल्हापूर, जळगांव, पालघर,

पुणे आणि अहमदनगर या जिल्हयातून प्रशिक्षणार्थ्यांनी यात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार श्री. राहुल घुगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पदव्युत्तर महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती सविता धनवडे, श्री. गोरक्षनाथ चौधरी, श्री. पोपट खर्से व श्री. सुभाष माने यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा




**दि. २६ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण कार्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. या दिनाचे औचित्य साधून २६ जानेवारी, २०२५ मध्ये मुंबई व दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये सहभागी होण्यासाठी दहा जिल्ह्यातील स्वयंसेवकांमधून एक स्वयंसेवक व एका स्वयंसेविकेची निवड करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान उपस्थित होते. यावेळी या निवड समितीचे परीक्षक म्हणून कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, एनसीसी कॅप्टन डॉ. सुनील फुलसावंगे, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी व सहाय्यक अधिक्षिका श्रीमती अर्चना टकले उपस्थित होते. यावेळी डॉ. चौहान म्हणाले की स्वयंसेवकांनी त्याग, समर्पण, समाजसेवा व देश सेवेचा मंत्र घेऊन काम करावे. युवकांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात संस्कार संस्कृतीची आठवण ठेवावी. यावेळी दहा जिल्ह्यातील स्वयंसेवक मुले, मुली यामधून वजन, उंची, रनिंग, परेड, नाट्य, संगीत, नृत्य, वादन, वकृत्व व व्यक्तिमत्व विकास या विविध चाचणीमधून एक स्वयंसेवक व एक स्वयंसेवीकेची पारदर्शीपणे निवड करण्यात आली. यामध्ये राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूरचा स्वयंसेवक प्रसाद मासाळ व बारामती येथील कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. पूनम तानवडे या स्वयंसेविकेची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार व डॉ. महावीरसिंग चौहान यांनी या दोन्ही स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. यावेळी मध्यवर्ती परिसर, राहुरी येथे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध कृषि संलग्न महाविद्यालयातून आलेल्या स्वयंसेवक व स्वयंसेविकांची उपस्थिती होती.

## कृषि विद्यापीठाच्या शेळी सुधार प्रकल्पांतर्गत शेळीपालनावरील एकदिवसीय प्रशिक्षण वर्ग व निविष्ठा वाटप संपन्न

**दि. २ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील भा.कृ.अ.प.-अ.भा.स. संगमनेरी शेळी सुधार प्रकल्पाच्या वतीने अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत राहुरी केंद्रातील खडांबे बु., संगमनेर केंद्रातील सावरगावतळ व श्रीरामपूर केंद्रातील देवळाली प्रवरा येथील शेळीपालकांसाठी शाश्वत शेळीपालन तंत्र या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले होते. शेळीपालकांना शाश्वत व व्यावसायिक शेळीपालनासंबधी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती असावी व नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सजगता निर्माण व्हावी ह्या हेतूने कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहेत. याप्रसंगी डॉ. विष्णू नरवडे मार्गदर्शनात म्हणाले की शेळीपालकांनी विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आपला शेळीपालन व्यवसाय शाश्वत करून जास्तीत जास्त नफा मिळवावा. शेळीपालन व्यवसाय म्हणून केल्यास त्यापासून शाश्वत उत्पादन शक्य आहे. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये तांत्रिक चर्चासत्रात डॉ. विष्णू नरवडे यांनी शास्त्रोक्त पद्धतीने पैदास, आहार व उपयुक्त झाडपाला, आरोग्य व्यवस्थापन तसेच शेळीच्या दुधाचे गुणधर्म यासंबधी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमप्रसंगी प्रक्षेत्र गणक श्री.





प्रवीण फटांगरे, श्री. गौरव घोलप, श्री. रमेश कल्हापुरे व शेळीपालक श्री. महेंद्र वाघमारे, सुरेंद्र वाघमारे, श्री. नानासाहेब साळे, श्री. योगेश साळे, श्री. स्वप्नील खंडागळे, श्री. राहुल खंडागळे उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षणार्थींना निविष्ठा व प्रशिक्षण पुस्तिका मान्यवरांच्या हस्ते देऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. सदरच्या तीन प्रशिक्षणात एकूण ६० प्रशिक्षणार्थींनी भाग घेऊन लाभ घेतला.

## नाशिक येथे टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतावर कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या भेटी व मार्गदर्शन



**दि. ३ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या हॉर्टसॅप प्रकल्पामार्फत नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील देशमाने बुद्रुक या भागातील प्लॉटला विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि विभागातील अधिकारी यांनी भेटी दिल्या. या चमूमध्ये वनस्पतीरोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख तथा हॉर्टसॅप प्रकल्प प्रमुख डॉ. आण्णासाहेब नवले, अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळपीक योजनाचे कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे, रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्राचे संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे, पाटोदा येथील कृषि विभागातील मंडळ कृषि अधिकारी श्री. एकनाथ बडाख, कृषि पर्यवेक्षक श्रीमती. शबाना अत्तार, श्री एन. टी. गायकवाड, कृषि सहाय्यक श्री. देशमाने हे उपस्थित होते. या भेटी दरम्यान शास्त्रज्ञ व अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांबरोबर सविस्तर चर्चा केली आणि चर्चेदरम्यान शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करुन टोमॅटो पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन तसेच अधिक उत्पादनासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेलेल्या गावांसाठी हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत वेळोवेळी एन.सी.आय.पी.एम., नवी दिल्ली या संकेतस्थळावर विद्यापीठामार्फत सदर पिकासाठी पीक सरंक्षण सल्ला दिला जातो. भेटीवेळी शेतकऱ्यांना विद्यापीठामार्फत तयार केलेल्या अडवायसरी देण्यात आल्या. सदर प्रक्षेत्र भेटीसाठी सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय कोळसे यांचे सहकार्य लाभले.

## धुळे कृषि महाविद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ समारंभ संपन्न



**दि. २४ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे कृषि महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर प्रथम वर्ष कृषि प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दीक्षारंभ समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धुळे येथील निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नितीन गावंडे आणि अतिरिक्त पोलीस अधिक्षक श्री. किशोर काळे उपस्थित होते. याप्रसंगी श्री. गावंडे आणि श्री. काळे यांनी विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्रातील संधी आणि आव्हाने याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करून आपले लक्ष्य साध्य करण्याचे आवाहन केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक बाबी, महाविद्यालयातील नियम, शिस्त व विविध बाबींची माहिती मुख्य समुपदेशक डॉ. पी.डी. सोनवणे, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राहुल देसले, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. जितेंद्र सूर्यवंशी, वसतीगृहाचे कुलमंत्री डॉ. एस.डी. पाटील, सहाय्यक ग्रंथपाल प्रा. व्ही.एम. वसावे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही.डी. बोरसे यांनी सविस्तरपणे दिली. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी आणि अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आपली ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र सूर्यवंशी यांनी केले तर आभार डॉ. श्रीकांत बन यांनी मानले.

## धुळे कृषि महाविद्यालयात प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन



**दि. २० सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे आणि विस्तार शिक्षण संस्था, आनंद, गुजरात यांच्या संयुक्त विद्यमाने स्ट्रॅटेजीज फॉर एक्सलन्स इन फॅकल्टी डेव्हलपमेंट फॉर एक्सटेन्शन या विषयावर एक महत्त्वपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम दि. १८ ते २० सप्टेंबर, २०२४ या कालावधीत कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे होते. यावेळी विस्तार शिक्षण संस्था, फॅकल्टी व प्रशिक्षणाचे कोर्स डायरेक्टर डॉ. ए. पी. निनामा उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. बी.एम. इल्हे म्हणाले की

या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक व अधिकारी अधिक प्रभावीपणे शेतकरी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतील, संवाद कौशल्यात सुधारणा होईल, वेळ व्यवस्थापन आणि तणाव व्यवस्थापन कौशल्ये व नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल. सहभागी प्रशिक्षणार्थींना डॉ. इल्हे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात प्रशिक्षणार्थींना संवाद कौशल्य, संवादातील अडथळे, वेळेचे व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन, नेतृत्व कौशल्य, विषयाचे प्रभावी सादरीकरण कसे करावे यासारख्या विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ. जे. एच. गायकवाड, प्राध्यापक, कृषि विस्तार शिक्षण, डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, धुळे, डॉ. श्रीकांत बन, तांत्रिक अधिकारी, कृषि महाविद्यालय, धुळे, श्री. भरत बाविस्कर तसेच कृषि महाविद्यालय व कृषि विज्ञान केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात धुळे कृषि महाविद्यालयातील आणि कृषि विज्ञान केंद्रातील एकूण ४० प्राध्यापक व अधिकारी यांनी सहभाग घेतला.

## अभिनंदन

## धुळे कृषि विज्ञान केंद्राला सन २०२३-२४ चा उत्कृष्ट कामासाठी सादरीकरणाचा पुरस्कार



**दि. ६ सप्टेंबर, २०२४.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद-अटारी, पुणे, विभाग-आठ अंतर्गत येत असलेल्या कृषि विज्ञान केंद्राचा विभागीय वार्षिक कार्यशाळा दि. ४ ते ६ सप्टेंबर, २०२४ दरम्यान जुनागढ कृषि विद्यापीठ, जुनागढ, गुजरात या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा येथील सर्व कृषि विज्ञान केंद्राचा सहभाग होता. यामध्ये प्रामुख्याने सन २०२३ मध्ये कृषि विज्ञान केंद्राने राबविण्यात आलेल्या उपक्रम, कार्यक्रम, त्यांचे निष्कर्ष सादरीकणाच्या माध्यमातून मांडण्यात आले. यामध्ये एकूण ८२ कृषि विज्ञान केंद्राने सादरीकरण केले. यामधून धुळे कृषि विज्ञान केंद्राला सन २०२३ चा उत्कृष्ट सदरीकरणाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. सदर पुरस्कार भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील विस्तार शिक्षण विभागाचे उपमहासंचालक डॉ. यु. एस. गौतम यांच्या हस्ते कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी स्वीकारला. या पुरस्काराबद्दल कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

## धुळे कृषि विज्ञान केंद्रामध्ये कृषक स्वर्ण समृद्धी कार्यक्रम सप्ताहाला सुरुवात

**दि. २३ सप्टेंबर २०२४.** भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय स्तरावर कृषि विज्ञान केंद्र स्थापनेचा २०२४ मध्ये सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. भारतामध्ये पहिल्या कृषि विज्ञान केंद्राची स्थापना १९७४ मध्ये पुदुचेरी येथे झाली आणि त्याला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने पूर्ण भारतभर कृषक स्वर्ण समृद्धी कार्यक्रम सप्ताह २३ ते २८ सप्टेंबर या कालावधीत ५०० पेक्षा जास्त कृषि विज्ञान केंद्रांमध्ये साजरा होत आहे. त्याचाच एक भाग आज कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषक स्वर्ण समृद्धी कार्यक्रम सप्ताह कार्यक्रमाचे उद्‌घाटन धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमाला कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. जे.एस. सूर्यवंशी, श्री. जगदीश कथेपुरी, डॉ. अतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. अध्यक्षीय मार्गदर्शनामध्ये डॉ. इल्हे यांनी कृषि पदवीचे शिक्षण घेत असताना, त्या शिक्षणाचा फायदा शेतकाऱ्याना ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम माध्यमातून कसा होईल याकडे लक्ष देत नियोजन कसे करावे यावर प्रकाश टाकत



मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी तर आभार प्रदर्शन डॉ. अतिश पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमास ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम, कृषि महाविद्यालय, धुळे येथील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## धुळे कृषि विज्ञान केंद्रामध्ये शेतकऱ्यांची एक दिवसीय कार्यशाळा संपन्न



**दि. २५ सप्टेंबर २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे, आत्मा, धुळे आणि लूपिन फाउंडेशन, धुळे यांच्या वतीने कृषि विज्ञान केंद्र, धुळे या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी भाजीपाला लागवड तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी धुळे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रकांत पवार प्रमुख उद्घाटक म्हणुन उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थितांमध्ये घटक कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, आत्मा प्रकल्प संचालक श्री. नवनाथ कोळपकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, महाराष्ट्र उपजीविका कार्यक्रम लूपिन फाउंडेशनचे समन्वय व्यवस्थापक श्री. नीलेश पवार, लूपिन फाउंडेशनचे श्री. सुनील सैदाने, डॉ. आतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्री. गौरव पाटील तसेच धुळे जिल्हयातील शेतकरी मोठ्या संखेने कार्यक्रमास उपस्थित होते.

## विस्तार शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप

**दि. १८ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे, विस्तार आणि शिक्षण संस्था, आनंद, गुजरात यांच्या संयुक्त विद्यमाने स्ट्रॅटेजीज फॉर एक्सलन्स इन फॅकल्टी डेव्हलपमेंट फॉर एक्सटेन्शन या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे होते. यावेळी आनंद येथील फॅकल्टी, विस्तार शिक्षण संस्था प्रशिक्षणाचे कोर्स डायरेक्टर डॉ. ए. पी. निनामा, प्राध्यापक डॉ. जे. एच. गायकवाड,



कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, तांत्रिक अधिकारी डॉ. श्रीकांत बन उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. इल्हे म्हणाले की या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील प्राध्यापक व अधिकारी अधिक प्रभावीपणे शेतकरी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतील, संवाद कौशल्यात सुधारणा होईल, वेळ व्यवस्थापन आणि तणाव व्यवस्थापन कौशल्ये व नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला. सर्व सहभागी प्रशिक्षणार्थींना डॉ. बी. एम. इल्हे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात धुळे कृषि महाविद्यालयातील आणि कृषि विज्ञान केंद्रातील एकूण ४० प्राध्यापक व अधिकारी यांनी सहभाग घेतला.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कांदा, लसुन लागवड तंत्रज्ञान या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न




**दि. २७ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने कृषि महाविद्यालय, धुळे येथे शेतकऱ्यांसाठी एक दिवसीय कांदा, लसुन लागवड तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. कैलाश शिरसाठ, आत्माचे प्रभारी प्रकल्प संचालक श्री. हितेंद्र सोनावणे, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. राहुल कुलकर्णी, डॉ. पंकज पाटील, श्रीमती. अमृता राउत, श्री. जगदीश काथेपुरी, डॉ. आतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्री. जयराम गावित उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. इल्हे म्हणाले की कांदा लसुन लागवडीमध्ये एकात्मिक रोग व्यवस्थापनाला अनन्यसाधारण महत्व आहे. तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ. दिनेश नांद्रे यांनी कांदा व लसुन लागवड तंत्रज्ञान या विषयी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. डॉ. पंकज पाटील यांनी कांदा, लसुन पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापन तर डॉ. अतिश पाटील यांनी पिकामधील अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. हितेंद्र सोनावणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जगदीश काथेपुरी यांनी केले तर आभार श्रीमती. अमृता राऊत यांनी केले. सदर कार्यक्रमास धुळे जिल्ह्यातील १५० शेतकरी बंधू भगिनी उपस्थित होते.

वर्ष :४, अंक क्रं. : ४५, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## धुळे कृषि महाविद्यालयात रक्तदान शिबिराला उत्साहवर्धक प्रतिसाद



**दि. २५ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे कृषि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. समृद्धी ठाकरे, श्री. चंदुलाल साठे आणि राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. प्रशांत पवार उपस्थित होते. डॉ. समृद्धी ठाकरे यांनी रक्तदानाचे महत्त्व आणि गरज याबाबत विस्तृत माहिती दिली. त्यांनी रक्तदान हे एक मानवीय कार्य असून यामुळे अनेक जीव वाचवता येतात असे सांगितले. या शिबिरात कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी असे एकूण ५० जणांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत पवार यांनी केले तर आभार प्रा. विपुल वसावे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. पी.डी. सोनवणे, डॉ. राहूल देसले, प्रा. नितीन दलाल, प्रा. जितेंद्र सूर्यवंशी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले.

## कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथे सुवर्ण कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताहाचे आयोजन





**दि. २३ ते २८ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथील कृषि विज्ञान केंद्रांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सोलापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे, पंढरपूर येथिल कडधान्य व तेलबिया संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. रमेश भदाणे, तालुका कृषि अधिकारी श्री. अतुल पवार, झुआरी फार्म हब लिमिटेडचे कृषि विद्यावेत्ता डॉ. अतुल पवार उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. रणशूर यांनी आधुनिक शेतीसाठी जमीन व पाणी आरोग्य तपासणी आवश्यक असून शास्त्रीय पद्धतीने शेती एक व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी विकसित करणे आवश्यक आहे जेणेकरून शेतीचे व शेतकऱ्यांचे निश्चितच उत्पादन वाढेल. डॉ. रणशूर यांच्या हस्ते कृषक सुवर्ण समृद्धी रथाचे उद्घाटन

करण्यात आले. डॉ. वळकुंडे यांनी आपल्या प्रस्ताविकेमध्ये कृषक सुवर्ण समृद्धी सप्ताहाविषयी अवगत केले तसेच कृषक सुवर्ण रथाद्वारे गावोगावी जनजागृती करण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्मार्ट शेती, ड्रोन तंत्रज्ञान, आयओटी, एआयद्वारे नवनवीन तंत्रज्ञान बदल घडवतील. यावेळी ड्रोनद्वारे फवारणी प्रात्यक्षिक डॉ. अतुल पवार यांनी घेतले तसेच शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान केले. तांत्रिक सत्रामध्ये डॉ. रमेश भदाणे, विषय विशेषज्ञ (कृषि विद्या) डॉ. स्वाती कदम, विषय विशेषज्ञ (मृद विज्ञान) श्रीमती. काजल म्हात्रे यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विषय विशेषज्ञ श्री. दिनेश क्षिरसागर तसेच आभार पीक विषय विशेषज्ञ डॉ. पंकज मडावी यांनी मानले.

## हाळगावच्या कृषि महाविद्यालयात प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहात संपन्न



**दि. ६ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथील कृषि पदवी अभ्यासक्रम २०२४–२५ च्या शैक्षणिक वर्षात नव्याने दाखल झालेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा नवीन शैक्षणिक धोरणात नव्याने सामविष्ठ केलेला अभिनव असा दीक्षारंभ समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार होते. यावेळी कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, अधिष्ठाता यांचे तांत्रिक अधिकारी डॉ. रवी आंधळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे व विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनावणे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. पवार म्हणाले की नविन शैक्षणिक धोरण २0२0 नुसार भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने सहाव्या अधिष्ठाता समितीचा प्रस्थावित केलेल्या नविन अभ्यासक्रमाचे कृषि महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी स्वागत करून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून त्याची अंमलबजावणी करावी. सदर अभ्यासक्रम हा कौशल्याभिमुख असल्याचे तसेच कृषि क्षेत्रात पदवीचे शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार एक वर्ष यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर कृषि प्रमाणपत्र मिळणार असून दोन वर्ष पूर्ण केल्यानंतर कृषि पदविका प्रमाणपत्र दिले जाणार आहे तसेच चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पदवी असे अभिनव उपक्रम सामविष्ठ असल्याचे विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी कुलसचिव श्री. अरुण आनंदकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना चांगला अभ्यास करावा, वसतिगृहातील जीवनाचा आनंद घ्यावा, त्याबरोबरच कालानुरूप स्वतःमध्ये बदल घडवण्यासाठी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. अनिल काळे म्हणाले की महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच्या विविध उपक्रमांचा अहवाल मांडला. कार्यक्रमात नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी आपला परिचय उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले तर आभार डॉ. दत्तात्रय सोनावणे यांनी मानले.

## हाळगाव कृषि महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत

**दि. ५ सप्टेंबर, २०२४.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे कृषि पदवी अभ्यासक्रम २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात नव्याने दाखल झालेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आरंभ–२०२४ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांनी भूषविले. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, सांस्कृतिक कार्यक्रम सल्लागार डॉ. नजिर तांबोळी, डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. उत्कर्षा



गवारे, अर्चना महाजन, डॉ. महेश निकम, डॉ. किरण चौधरी, श्री. संजय आढाव, श्री. महेश सुरवसे, श्री. किरण अडसुर, श्री. प्रदिप धारेकर उपस्थित होते. यावेळी डॉ. अनिल काळे यांनी प्रथम वर्षात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून दिला. आरंभ-२०२४ कार्यक्रमाचे आयोजन द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांकडून करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात नृत्य, गीत गायन, नकला, विविध मनोरंजनाचे खेळ इत्यादी उपक्रमांचा समावेश होता. प्रथम वर्षातील विद्यार्थी प्रविण पाटील आणि अनुष्का पाटील यांनी आपले कलागुण सादर करून बाजी मारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्षातील विद्यार्थी निशा पाचारणे व भूषण बाबर यांनी तर आभार जयरत्न धेंजे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे दीक्षारंभ समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न






**दि. २४ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील कृषि पदवी अभ्यासक्रमात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुक्ताईनगरचे तहसीलदार श्री. गिरीश वखारे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. जी. पी. देशमुख, सहाय्यक कुलसचिव, श्री. प्रशांत नागे, डॉ. गणेश देशमुख, विद्या शाखा प्रभारी, डॉ. आर.डी. चौधरी, डॉ. आर. एस. शेख, डॉ. बी. डी. रोमाडे, प्रा. आर. एस. बागुल, प्रा. एन. जी. धूर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. मनीषा पालवे, डॉ. विजय राऊत उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. पाटील यांनी नवीन अभ्यासक्रम हा कोशल्याभिमुख असून कृषि क्षेत्रात त्याचे महत्व समजावून दिले. डॉ. चौधरी यांनी नवीन शैक्षणिक धोरण २०२० अन्वये सहाव्या अधिष्ठाता समितीने प्रस्तावित केलेल्या नवीन अभ्यासक्रमाची माहिती दिली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आपला परिचय करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जी. पी. देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तुषार भोसले यांनी तर आभार डॉ. कुशल ढाके यांनी मानले.

वर्ष :४, अंक क्रं. : ४५, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा




**दि. २४ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा. विजय डांगे उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धूर्वे, डॉ. जी.पी. देशमुख, डॉ. बी डी रोमाडे, डॉ. रियाज शेख, डॉ. रंगनाथ बागुल, डॉ. रमेश चौधरी, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर बंड उपस्थित होते. यावेळी डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी राष्ट्रसेवेसाठी आपले संकल्प पक्के करण्याबाबत व सामाजिक कार्यामध्ये योगदान देण्याचे आवाहन केले. प्रा. डांगे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून दिलेल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनाच्या महत्त्वपूर्ण कार्याची माहिती दिली. श्री. धूर्वे यांनी राष्ट्रीय सेवा योजनाची पार्श्वभूमी विषद केली व स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमात सौरभ होनमाने, स्नेहल देसाई, नीलम कांबळे या स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी परिसरात स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण राबवली. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी केकाने हिने तर आभार अभिलाषा पठारे हिने मानले. कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ.कुशल ढाके व रां.से. यों. स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे आरंभ-२ के २०२४ थाटात साजरा



**दि. २५ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या जळगांव जिल्ह्यातील कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे आगमन व स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. यावेळी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. रियाज शेख, डॉ. रमेश चौधरी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, प्रा. रंगनाथ बागुल, प्रा. नामदेव धुर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. मनीषा पालवे, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड तसेच लिपिक वर्गीय कर्मचारी

उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. पाटील म्हणाले की ज्ञान संपादन करण्यासाठी व आयुष्यात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी जीवनात सातत्य टिकून ठेवणे, शिस्तीत राहणे व सुजान नागरिक म्हणून जीवन जगणे महत्वाचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. गणेश देशमुख यांनी केले. प्रास्ताविकेत त्यांनी विद्यार्थी जीवनात पाळावयाचे नियम आणि सवयी याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात नृत्य सादरीकरण, कविता वाचन, गीत गायन आणि वादन इत्यादी कार्यक्रमाचा समावेश करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. वैष्णवी केकाने या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मानसी देसाई, श्री. कौस्तुभ होनमाने, कु. सुषमा पाटील श्री. अनिकेत बोरसे यांनी केले.

## कोल्हापूर परिसरातील मका आद्यरेखा प्रात्यक्षिक प्रक्षेत्राला मका संशोधन पडताळणीच्या शास्त्रज्ञांची भेट



**दि. २७ सप्टेंबर, २०२४.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद,नवी दिल्ली व भारतीय मका अनुसंधान संस्था, लुधियाना येथील मका संशोधन पडताळणी चमूने मका उत्पादक संस्था व मका उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर भेटी देण्यात आल्या. या चमूचे नेतृत्व डॉ.एस.बी.सिंग हे करत होते. त्यांच्याबरोबर, मणिपूर मधील इंफाळ येथील मका किटकशास्त्रज्ञ डॉ.श्रीमती जेती कोन्सम, हरियाणामधील कर्नालचे मका कृषि विद्यावेत्ता डॉ. नरेंदर सिंग, हैदराबाद येथील मका रोगशास्त्रज्ञ डॉ. मल्ली यांचा समावेश होता. यावेळी डॉ. सिंग मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापुर यांच्या अधिनस्त कसबा बावडा येथील मका संशोधन केंद्र एक उत्कृष्ट मका पिकावरील संशोधन करणारे केंद्र आहे. या संशोधन केंद्राने अनेक विकसीत वाण व मका उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी दिल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेत निश्चितच फरक पडला आहे. यामुळे कोल्हापूरच्या मका संशोधन केंद्राचे संशोधन केंद्राचे संशोधन कार्य प्रशंसनीय आहे. आपल्या अध्यक्षीय भाषणात सहयोगी संशोधन संचालक डॉ. अशोक पिसाळ यांनी सध्या शेतकऱ्याच्या पारंपारिक शेतीची परिस्थिती हि कृषि विद्यापीठाच्या तंत्रज्ञानामुळे बदललेली असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संशोधन केंद्राचे मका पैदासकार डॉ. सुनिल कराड यांनी केले. शास्त्रज्ञ बैठकीमध्ये विभागीय कृषि संशोधन केंद्रातील मृदा शास्त्रज्ञ डॉ. प्रवीण गजभिये, केंद्रामधील नाचणी पैदासकार डॉ. योगेश बन, कृषि अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब कांबळे, पशुविज्ञान तज्ञ डॉ.संभाजी जाधव, कीटकशास्त्र विषयक श्री. सुशांत महाडीक, वरिष्ठ संशोधन सहाय्यक ग्रामीण मौसम विभागाचे तंत्रज्ञ डॉ. मयूर सुतार, शास्त्रज्ञ व अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. सुहास भिंगारदेवे यांनी केले.

## खुरासणी उत्पादक आदिवासी शेतकऱ्यांच्या फुले वैतरणा या वाणाच्या प्रात्यक्षिक प्लॉटला शास्त्रज्ञांच्या भेटी

**दि. ७ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपुरी येथे खुरासणी या तेलवर्गीय पिकावर संशोधन केले जाते. या संशोधन केंद्रामार्फत कुरुंगवाडी येथे खुरासणी पिकाची पीक प्रात्याक्षिके घेतली जात आहेत. यासाठी प्रकल्प समन्वय संचालनालय, अखिल भारतीय समन्वित खुरासणी संशोधन प्रकल्प, जवाहरलाल नेहरू कृषि विद्यापीठ, जबलपूर यांचेकडून अनुदान प्राप्त आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, सहयोगी संशोधन संचालक, डॉ. हेमंत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली या पीक प्रत्याक्षिकांसाठी शेतकऱ्यांची निवड, वेळोवेळी मार्गदर्शन विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपुरी येथील खुरासणी पैदासकार डॉ. दिपक डामसे यांनी केले. यावेळी कृषि विभागाचे कृषि सहाय्यक श्री. विश्वनाथ गांगड, श्री. प्रवीण लोहकरे यांनी भेटीचे नियोजन केले. त्या अनुषंगाने



प्रकल्प संचालक डॉ. आनंद विश्वकर्मा यांनी विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञांसमवेत कुरुंगवाडी, ता. इगतपुरी येथील खुरासणी उत्पादक आदिवासी शेतकऱ्यांच्या फुले वैतरणा या वाणाच्या प्रात्यक्षिक प्लॉटला भेटी देवून त्यांच्याशी संवाद साधला.

## तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव येथे शेतकरी प्रशिक्षण आयोजन



**दि. ५ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव व भुईमुग संशोधन संचालनालय, जुनागढ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शेतकरी प्रशिक्षण, पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा या विषयावर जळगाव येथील कृषि विज्ञान केंद्र, ममुराबाद येथे आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाअंतर्गत विविध विषयावर तज्ञांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना देण्यात आले. सदरच्या प्रशिक्षणात जळगाव येथील तेलबीया संशोधन केद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दिपक दहात यांनी अनुक्रमे पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा आणि बौद्धिक संपदा हक्क आणि त्यांचे कृषि आणि संलग्न क्षेत्राचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ श्री. वैभव सुर्यवंशी यांनी पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा तसेच प्रगतशील शेतकरी श्री. किशोर चौधरी यांनी भरीत वांगे जी.आय. या विषयावर मार्गदर्शन केले.

## अंजीर, सिताफळ संशोधन केंद्रातर्फे काळेवाडी येथे शिवार फेरी संपन्न

**दि. २० सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर, सिताफळ संशोधन प्रकल्प, जाधववाडी, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आणि पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे काळेवाडी येथे श्री. निलेश काळे, अध्यक्ष, पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघ यांच्या सिताफळ व अंजीर बागेमध्ये शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे येथील महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. विजय कोलते, पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघाचे पदाधिकारी श्री. माऊली मेमाणे, श्री. आदिनाथ काळे, श्री. अमित काळे, श्री. मंगेश लवांडे, श्री. भाऊ टिळेकर,





श्री. प्रदीप काळे, श्री. अरुण काळे, श्री. उमेश झेंडे, श्री. समीर काळे, श्री. रवींद्र काळे, श्री. गणेश काळे, श्री. राहुल झेंडे आणि तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि सहाय्यक श्री. योगेश पवार व श्री. कोंडीबा जरांडे तसेच परिसरातील अंजीर व सीताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. उद्यानविद्यावेत्ता डॉ.प्रदीप दळवे यांनी यावेळी सद्यस्थितीतील सिताफळ बागेचे अन्नद्रव्य, पाणी व्यवस्थापन, सीताफळ भेगाळणेची समस्या व उपाय मीठा बहराचे काटेकोर नियोजन यावर मार्गदर्शन केले. वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. युवराज बालगुडे यांनी अंजीर व सीताफळ पिकाचे एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, सिताफळावरील पिठ्या ढेकूण व्यवस्थापन, सिताफळ काळे पडणे व उपाय, मीठा बहर व्यवस्थापन करताना बोर्डो मिश्रणाचा वापर या विषयावर मार्गदर्शन केले.

## जळगांव जिल्ह्यात भुईमुग उत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील शेतकरी प्रशिक्षण संपन्न



**दि. १३ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या जळगांव येथील तेलबिया संशोधन केंद्राच्या वतीने लोण खुर्द, ता. अमळनेर, जि. जळगाव या ठिकाणी आद्यरेशीय भुईमुग प्रयोग (FLD) अंतर्गत भुईमुग उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर शेतकरी प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. सदरचा कार्यक्रम तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. डी.व्ही. दहात यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी डॉ. दहात यांनी भुईमुगाचे विविध वाण व बिजोत्पादन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. कृषि विज्ञान केंद्र, ममुराबादचे विषय विशेषज्ञ डॉ. एच.जे. जाधव यांनी भुईमुग उत्पादन तंत्रज्ञान व श्री. वैभव सुर्यवंशी यांनी भुईमुग पीक यांत्रिकीकरण याबद्दल माहिती दिली. तसेच भुईमुगातील किड व रोग व्यवस्थापन या विषयी सहयोगी प्राध्यापक डॉ. आर.एम. खडतरे यांनी मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय नंदनवार, कनिष्ठ संशोधन सहाय्यक यांनी केले तसेच सौ. शितल चौधरी व श्री. तुषार बिरारी यांनी कार्यक्रम आयोजित करण्यात सहकार्य केले.

## कसबे डिग्रज येथील कृषि तंत्र विद्यालयात विद्यार्थी हितगुज, भेट व मार्गदर्शन



**दि. १८ सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, ता. मिरज, जि. सांगली येथे सहयोगी संशोधन संचालक डॉ. अशोककुमार पिसाळ यांनी भेट देऊन येथील प्रथम आणि द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी उपस्थित होते. कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज येथे दोन वर्ष कालावाधीचा कृषि पदविका अभ्यासक्रम राबविला जातो. विद्यालयाच्या प्रक्षेत्रावर विद्यार्थी प्रात्यक्षिक करत असतांना डॉ. पिसाळ यांनी भेट दिली व त्यांना मार्गदर्शन केले. मका पीक तज्ञ डॉ. सुनील कराड यांनी बियाणे उद्योग मोठा असून बियाण्याचे विविध स्तर असतात. त्यांनी बीजोत्पादनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कृषि शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना स्वावलंबी होता येते असे मत प्राचार्य डॉ. मनोज माळी यांनी मांडले. श्री. प्रदीप मुर्कीभावी यांनी प्रास्ताविक केले तर आभार प्रदर्शन प्रज्वल गागरे यांनी केले.

## ऑक्टोबर महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- आडसाली ऊसाच्या लागणीस को ८६०३२ या जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश प्रति हेक्टरी) खतमात्रेच्या १० टक्के नत्र ५० किलो प्रति हेक्टरी खताची तिसरी मात्रा (१२ ते १६ आठवडे वयाच्या ऊसासाठी) देण्यासाठी युरीया ११० किलो प्रति हेक्टरी वापरावा व इतर जातीच्या ऊसाकरीता प्रति हेक्टरी ४० किलो नत्र खतांचा तिसरा हप्ता (८७ किलो युरिया) (१.९३ पोती) लागणीनंतर १२ ते १६ आठवडयांनी द्यावा. नत्र खताची मात्रा देण्यासाठी निमकोटेड युरीयाचा वापर करावा.
- आडसाली ऊसाच्या लागणीस ६० दिवसांनी प्रति हेक्टरी ५ लिटर मल्टीमॅक्रोन्युट्रीयंट (नत्र ८%, स्फुरद ८% व पालश ८%) व मल्टीमायक्रोन्युंट्रीयंट (ग्रेड–२) या द्रवरूप खतांची प्रत्येकी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊसाच्या लागणीस ९० दिवस झाले असल्यास प्रति हेक्टरी ७.५ लिटर मल्टीमॅक्रोन्युट्रीयंट व मल्टीमायक्रोन्युटीयंटची प्रत्येकी ७५० लिटर पाण्यातून फवारणी करावी.
- आडसाली ऊसाला ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धकाची बिजप्रक्रीया लागणीचे वेळी केलेली नसल्यास ६० दिवसांनी १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर जिवाणू संवर्धकाची २०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारणी करावी.
- आडसाली ऊसासाठी ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवडयात संजीवकांच्या दुसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी २२५ लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) ९ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) ९ ग्रॅम, २२५० ग्रॅम १९:१९:१९, ५६२ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व ११२५ ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- पूर्वहंगामी उसाच्या लागवडीसाठी पूर्वतयारी करा.
- पूर्वहंगामी ऊसाची लागण १५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत पूर्ण करा.
- लागणीसाठी को ८६०३२, फुले ०२६५, फुले १०००१, फुले ०९०५७, कोसी ६७१,फुले ११०८२, फुले ऊस १५०१२ आणि फुले ऊस १३००७ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांचा जमिनीच्या मगदूरानुसार वापर करावा.

वर्ष :४, अंक क्रं. : ४९, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) (१.९३ पोती) को ८६०३२ जातीसाठी व इतर सर्व जातींसाठी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) (१.६४ पोती)तसेच ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८ पोती) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.१६ पोती) ही रासायनिक खते सरीमध्ये द्यावीत.
- लागणीपूर्वी बेण्यास १० ग्रॅ कार्बेन्डॅझिम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १० मिनीटे बुड्वुन बेणे प्रक्रिया करावी. या बिजप्रक्रियेनंतर १ किलो ॲसेटोबॅक्टर व १२५ स्फुरद विरघळविणारे जीवाणू प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात कांडया ३० मिनीटे बुडवाव्यात.
- पाणी बचतीच्या होण्याच्या दृष्टीने मध्यम जमिनीसाठी ७५–१५० सें.मी. पट्टा पद्धतीचा वापर करावा यासाठी ७५ सें.मी. अंतराच्या जोड ओळीनंतर एक ओळ रिकामी सोडावी सलग पद्धतीने लागवडीसाठी हलक्या जमिनीत ९० सें.मी., मध्यम जमिनीत १०० सें.मी. तर भारी जमिनीमध्ये १२० सें.मी. दोन सऱ्यातील अंतर ठेवावे. पाण्याच्या अधिक बचतीसाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा.
- लागणीनंतर वापसा येताच ५० ग्रॅम ॲट्राझिन किंवा मेट्रीब्यूझीन १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवर फवारावे. जमिन तुडवली जाणार नाही याची काळजी घ्यावी.

### बागायती कापूस

- मोठ्या प्रमाणात गुलाबी बोंडअळीचे पतंग अडकविण्यासाठी प्रति हेक्टरी १० ते १२ कामगंध सापळे लावावेत.
- गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किर्डीच्या अवस्था नष्ट होतील.

### हरभरा व्यवस्थापन

- २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर पर्यंत बागायती हरभरा बीजप्रकिया करुन पेरावा.
- पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपूर्व तणनाशक पेंडिमेथॉलीन फवारावे.
- किडनियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा. यामध्ये सापळा पीक, कामगंध सापळे, पक्षी थांबे याचा अवलंब करावा.

### तूर

- पिकाच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत किडी पासून संरक्षणासाठी हेलिकोकिल (५०० मिली / ५०० लि. पाणी ) या जैविक किटकनाशकाची दुसरी फवारणी करावी व आवश्यकता असेल तर तिसरी फवारणी १८.५ % एस सी क्लोरअन्ट्रीनिलोप्रोल १५० मिली अथवा इमामेक्टीन बेन्झोएट ५०% एस. जी. २०० ग्रॅम अथवा फल्युबेंडामाईड ४५ % एस. सी. १५० मिली/ ५०० लि. पाणी या किटकनाशकाची करावी.
- शेंगा भरण्याच्या अवस्थेत पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी दयावे किंवा २ टक्के युरियाची किंवा २ टक्के पोटॅशिअम नाईट्रेटची फवारणी करावी.

### नाचणी पीक

- नाचणी पीक पावसाच्या पाण्यावर घेतले जाते. पावसामध्ये खंड पडल्यास उपलब्धतेनुसार संरक्षित पाणी द्यावे.
- भेसळ काढणे.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :४, अंक क्र. : ४५, सप्टेंबर, २०२४

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवडा – पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एक रोप ठेवावे व पेरणीनंतर ३ आठवड्यांने फटीच्या कोळप्याने पहिली कोळपणी करावी.
- दुसरा पंधरवडा – खोडकिडा नियंत्रण– खोडकिडा प्रादुर्भाव दिसल्यास क्युनॉलफॉस २५ ईसी ७५० मीली प्रवाही ५०० लीटर पाणी प्रती हेक्टरी फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पहिली खुरपणी करावी. पेरणीनंतर ५ आठवड्याने पासेच्या कोळप्याने दुसरी कोळपणी करावी आणि गरज असल्यास पहिले संरक्षित पाणी द्यावे.

### गहू

- गव्हासाठी भारी व खोल जमीन निवडून पूर्व मशागत करणे.
- बागायती पेरणीसाठी फुले समाधान, तपोवन, त्र्यंबक, फुले सात्विक या जातीमधून हेक्टरसाठी १०० किलो बियाणे घेणे.
- जिरायती पेरणीसाठी पंचवटी किंवा नेत्रावती या वाणाचे हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे घेणे.

### भात

- पाणी व्यवस्थापन काढणीपूर्वी १० दिवस अगोदर पाण्याचा निचरा करावा.
- कापणी पीक निसवल्यावर साधारणपणे २५ ते ३० दिवसांनी ओंबीतील ८० ते ९०% दाणे पक्व झाल्यावर भाताची कापणी करावी. वैभव विळ्याचा वापर यासाठी करावा. यामुळे खोडकिडीचे नियंत्रण होते.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – पक्व फळांची काढणी करणे व खतांची हलकी मात्रा देऊन बाग ताणावर सोडावी.
- सिताफळ – गरज असल्यास पाणी व्यवस्थापन करून पिकलेली फळे काढावीत.
- बोर – गरज असल्यास पाणी व रोग किडींचे नियंत्रण करावे.
- आवळा – पक्व झालेली फळे काढण्यात सुरवात करावी.
- अंजीर – खतांचे नियोजन करणे व मिठा बहार धरणेसाठी पाण्याचे नियोजन करावे.
- जांभूळ– बाग ताणावर सोडावी.
- कागदी लिंबू – हस्त बहाराचे नियोजनासाठी १ टक्का पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.
- मोसंबी : आंबे बहाराच्या फळांची काढणी करावी.
- द्राक्ष : गोडी छाटणी वेळेत करावी व केवडा रोगाचे नियंत्रण करावे. उडद्या किडीच्या नियंत्रणासाठी लंम्बडा साहेलोथ्रिन ४.९ सी.एस. ५ मिली/१० लि. पाण्यातून फवारावे.

### भाजीपाला व्यवस्थापन

- रांगडा कांदा लागवड पहिल्या आठवड्यात पूर्ण करावी.
- खरीप कांदा लागवडीस नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- खरीप हंगामातील वांगी, मिरची, टोमॅटो काढणी करावी.
- कोबी व फ्लॉवर पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाला पिकाची काढणी करावी.
- भेंडी व गवार पिकाची काढणी करावी.
- सर्व खरीप भाजीपाला पिकांवरील कीड व रोगाचे नियंत्रणाचे उपाय करावेत.
- दुसऱ्या पंधरवड्यापासून लसूण लागवडीस सुरूवात करावी.
- रबी हंगामातील कांदा पिकासाठी रोपवाटीका तयार करावी.
- कांदा बियाण्याची पेरणी करावी.

वर्ष :४, अंक क्रं. : ४५, सप्टेंबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- रबी हंगामातील टोमॅटो, फ्लॉवर, कोबी पिकाची रोपवाटीका करावी.
- वाटाणा पिकाची लागवड दुसऱ्या पंधरवड्यापासून करावी.
- रबी हंगामामध्ये येणाऱ्या गाजर, मुळा, बिट पिकाची लागवड करावी.

**आले**

- खोड पोखरणारी अळीचे नियंत्रण करावे. ही किड मुख्यत: जुलै ते ऑक्टोबर या काळामध्ये आढळते. या किडीची अळी छोटया खोडाला छिद्र करते आणि त्यावर उपजिविका करते. त्यामुळे खोड पिवळे पडून वाळण्यास सुरुवात होते. अळीने पाडलेल्या छिद्रावर जाळीदार भाग दिसतो. या किडीच्या नियंत्रणासाठी एक महिन्याच्या अंतराने निमतेल १ टक्के फवारणी करावी.
- सुत्रकृमी : काही भागामध्ये या पिकावर सुत्रकृमीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. पिकाच्या मुळाभोवती राहून सुईसारख्या अवयवाने मुळातील रस शोषण करतात. त्यामुळे पिकाची वाढ खुंटते व पाने पिवळी पडतात. तसेच यांनी केलेल्या छिद्रातून कंदकुजीस कारणीभूत असलेल्या बुरशींचा सहज शिरकाव होतो. सुत्रकृमीच्या नियंत्रणासाठी लागवडीच्या वेळी ट्रायकोड्र्मा प्लस ५ किलो या प्रमाणात द्यावे. किंवा १८ ते २० क्विं/हे. निंबोळी पेंडीचा वापर करावा. ट्रायकोडर्मा वापरतांना ७ ते १० दिवस सेंद्रीय पदार्थात मुरवुनच जमिनीत घालावे व माती आड करावे.
- हुमणी नियंत्रणासाठी मेटाऱ्हाझीयम या जैविक किडनाशकाचा वापर करावा तसेच भुंगेरे आकर्षित करण्यासाठी एरंड आंबवण सापळयाचा वापर करावा.
- काढणी आणि उत्पादन आले पीक ७५ टक्के परिपक्व झालेनंतर काढणी केली तरी मार्केटला विक्रीसाठी चालते. हिरवे आले म्हणून वापरावयाचे असल्यास पिकाची काढणी ६ महिन्यांनी करवी.

**पशुसंवर्धन**

- या महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात आंतरकृमी व बाह्य परोपजीवींचा नायनाट करण्यासाठी बहुप्रभावी जंतनाशक औषध पशुवैद्यकाच्या सहाय्याने दयावे.
- उर्जा व प्रथितेयुक्त पशु आहाराचा समावेश करुन पशु आहार वाढवावा.
- थंडीची सुरुवात होवून श्वसनाचे आजार संभावण्याची शक्यता असते त्यामुळे विशेषत: लहान वासरांची काळजी घ्यावी.

**रिमोट पायलट (ड्रोन) प्रशिक्षण संस्था**

- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे भारत सरकारच्या नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (उऋछउअ) मान्यताप्राप्त अधिकृत रिमोट पायलट (ड्रोन) प्रशिक्षण संस्था (ठझढज) कार्यरत आहे.
- दर संस्थेद्वारे ड्रोन पायलट प्रमाणपत्र प्रशिक्षण दिले जाते.
- म. फु. कृ. वि. राहुरी हे रिमोट पायलट (ड्रोन) प्रशिक्षण संस्था स्थापन करणारे भारतातील पहिले कृषि विद्यापीठ आहे.
- आतापर्यंत १०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींना रिमोट पायलट (ड्रोन) प्रमाणपत्र दिलेले आहे.
- प्रशिक्षण अभ्यासक्रम: तासिका वर्ग: २ दिवस – सिम्युलेटर: १ दिवस ड्रोन प्रत्यक्ष हाताळणी प्रशिक्षण: २ दिवस अतिरिक्त विशेष कृषि ड्रोन (फवारणी) प्रशिक्षण: २ दिवस
- पात्रता १० वी पास किवा त्या समान – वय: १८–६५ वर्षांपर्यंत, वैद्यकीय प्रमाणपत्र.
- सुविधा प्रशस्त ड्रोन प्रयोगशाळा – प्रशिक्षित ड्रोन प्रशिक्षक विशेष कृषि ड्रोन प्रयोगशाळा आधुनिक प्रशिक्षण वर्ग व गंथालय प्रशिक्षणाच्या ठिकाणी राहण्याची व जेवणाची व्यवस्था
- संपर्क: कास्ट प्रकल्पाला भेट द्यावी.

**प्रसारीत यंत्रे**

१. फुले भेंडी प्लकर: भेंडी तोडणीसाठी हस्तचलित फुले भेंडी प्लकर यंत्र प्रसारित करण्यात आले.

२. फुले मका कणीस सोलणी व दाणे काढणी यंत्र: मक्याची कणसे सोलूण दाणे वेगळे करण्यासाठी विद्युतमोटरचलित फुले मका कणीस

सोलणी व दाणे काढणी यंत्र प्रसारित करण्यात आले.

३. फुले अंजीर प्लकर: अंजीर फळांची तोडणी करण्यासाठी मनुष्यचलित फुले अंजीर प्लकर यंत्र प्रसारित करण्यात आले.

४. फुले पोर्टेबल हायड्रॉलीक जनावरे उचलण्याचे यंत्र: आजारी जनावरांना सहजपणे उचलून उपचार करण्यासाठी फुले पोर्टेबल हायड्रॉलीक जनावरे उचलण्याचे यंत्र प्रसारित करण्यात आले.

५. फुले गुळ घोटणी यंत्र: गुळ बनवताना घोटणी करणे आणि गुळाच्या ढेपा बनविण्यासाठी विद्युत मोटर चलीत फुले गुळ घोटणी यंत्र प्रसारित करण्यात आले.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५५/२०२४**